मुंबई उच्च न्यायालयाच्या मा.न्यायमुर्तींकरिता नवीन ६३ वाहने खरेदी करण्यास निधी उपलब्ध करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

शासन निर्णय :- क्र. वाहन-६०१८/११७९/प्र.क्र.१०६/का.४

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक :- ०७ मार्च, २०१९.

<u>संदर्भ</u> :- १) प्रबंधक (मुळ शाखा) उच्च न्यायालय मुंबई यांचे पत्र क्र. P/SC/२०१८/१४३६ दि. १२/१२/२०१८, क्र. P/SC/२०१९/१३३, दि. १९/०१/२०१९, व क्र. ३१६/२०१९, दि. २६/०२/२०१९ .

२) शासन निर्णय, विधि व न्याय विभाग, क्र. वाहन ६०१८/३५६/प्र.क्र. २९/का-४, दि.०७/१२/२०१८.

३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. वाहन २०१६/प्र.क्र.५१/१६/विनियम, दि. २१/०१/२०१७.

४) शासन परिपत्रक, वित्त विभाग, संकीर्ण-२०१९/प्र.क्र. १/२०१९/कोषा प्रशा-५, दि. ३१/०१/२०१९.

५) शासन निर्णय, विधि व न्याय, समक्रमांक, दि. २७/०२/२०१९.

<u>प्रस्तावना :-</u>

मुंबई उच्च न्यायालयाच्या मा. न्यायमुर्तींच्या वापरात असलेली जूनी६३वाहने निर्लेखित करून नवीन ६३ वाहने खरेदी करण्यास संदर्भाधीन शासन निर्णय, दि. २७/०२/२०१९ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. सदर ६३ वाहने खरेदी करण्याकरिता प्रति वाहन रु. २० लक्ष याप्रमाणे एकूण रु. १२.६० कोटी इतक्या निधीची तरतूद करून सदरहू निधी संक्षिप्त देयकाद्वारे उपलब्ध करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

मुंबई उच्च न्यायालयाच्या मा. न्यायमुर्तींकरिता नवीन ६३ वाहने खरेदी करण्यास संदर्भाधीन शासन निर्णय, विधि व न्याय विभाग, दि. २७/०२/२०१९ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. उच्च न्यायालयाच्या न्यायमुर्तींकरिता शासन निर्णय, वित्त विभाग, दि. २१/०१/२०१७ अन्वये नवीन वाहन खरेदीसाठी प्रति वाहन रु. २०.०० लक्ष याप्रमाणे किंमत मर्यादा विहीत करण्यात आली आहे. त्यानुसार सदर ६३ वाहनांसाठी एकूण रु. १२.६० कोटी इतका निधी मुख्य लेखाशिर्ष मागणी क्र. जे-१, २०१४ (न्यायदान) - १०२ उच्च न्यायालये, (०१) (०१) न्यायाधिश (२०१४ ००६५) (अनिवार्य) १३ कार्यालयीन खर्च या उद्दिष्टाखाली सन२०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये पूनर्विनियोजनाद्वारे उपलब्ध होणाऱ्या निधीतून खर्च करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. मागणी क्र. जे-१, २०१४ (न्यायदान), १०२ उच्च न्यायालये (०२) (०१) प्रबंधक, मूळ न्यायशाखा (२०१४ ००७४) (अनिवार्य) १३ कार्यालयीन खर्च या उद्दिष्टाखाली सन२०१८ च्या हिवाळी पूरक मागणीद्वारे उपलब्ध करण्यात आलेल्या निधीतून पुनर्विनियोजनाद्वारे सदर प्रयोजनासाठी परिच्छेद एक येथे नमूद लेखाशिर्षाखालील उद्दिष्टांतर्गत निधी उपलब्ध करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. वित्त विभाग, परिपत्रक, दि. ३१/०१/२०१९ अन्वये शासकीय खरेदीस असलेल्या निर्बंधातून सदर वाहन खरेदीकरिता अपवादात्मक बाब म्हणून सूट देण्यात येत आहे.

४. तसेच सदर वाहन खरेदीसाठी रु. १२.६० कोटी इतका निधी खालील अटींच्या अधिन राहून संक्षिप्त देयकाद्वारे उपलब्ध करण्यास देखील मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१) शासन परिपत्रक क्र. मुंविनि-१०१६/प्र.क्र.३८/१७/विनियम, दि. १८/१२/२०१७ मधील सूचनेनुसार (२०१४ ००६५) या लेखाशीर्षाखाली दि. ३१/०१/२०१९ यापूर्वीची तपशीलवार देयक प्रलंबित नाही.

२) दि. ३१/०१/२०१९ नंतर संक्षिप्त देयकावर काढलेल्या सर्व तपशीलवार देयकांचा तत्परतेने निपटारा करण्यात येईल.

३) या संक्षिप्त देयकाचे तपशिलवार देयक एक महिन्याच्या आत सादर करण्यात येईल.

४) खर्च नियमित देयकाद्वारे करणे शक्य नसून त्यासाठी संक्षिप्त देयकावर रक्कम काढणे अनिवार्य आहे.

५) या संक्षिप्त देयकाचे तपशिलवार देयक विहीत मुदतीत सादर करण्याची तसेचसदर निर्लेखित करण्यात आलेल्या ६३ वाहनांऐवजी नवीन वाहने खरेदी झाल्यावर जूनी६३ वाहने शासनास आवश्यक कागदपत्रांसह वर्ग करण्याचीव्यक्तिगत जबाबदारी आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील.

६) मासिक निधी विवरणपत्रानुसार याकरीता निधी उपलब्ध आहे.

५. उक्त निधी पुनर्विनियोजन आणि निधी संक्षिप्त देयकाद्वारे काढण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही उच्च न्यायालय प्रशासनाने करावी.

६. प्रस्तुत शासन निर्णय हा वित्त विभागाचे अनौ. संदर्भ क्र.१०९/२०१९विनियम, दि.०७/०३/२०१९ अन्वये प्राप्त झालेल्या राज्यस्तरीय वाहन आढावा समितीच्या तथा सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३०८१३५३२००८१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sanjeev R Keluskar

Digitally signed by Sanjeev R Keluskar
DN: CN = Sanjeev R Keluskar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Law and Judiciary Department
Date: 2019.03.08 13:57:59 +05'30'

(संजीव केळुसकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. महाप्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई.
२. महालेखापाल (लेखापरीक्षा/लेखा अनुज्ञेयता),महाराष्ट्र-एक, मुंबई.
३. प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.

४. प्रबंधक (पर्सोनेल), अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.
५. प्रबंधक (वित्त व अर्थसंकल्प), अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
८. वित्त विभाग, व्यय ५, विनियम शाखा, मंत्रालय, मुंबई.
९. कार्यासन अधिकारी, का. २३/२५, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०.निवड नस्ती.